

जो आधी बोलेल, तो हरेल

इद्रिस शाह



जो आधी बोलेल, तो हरेल







एके दिवशी एक नवपरिणीत जोडपं
आपल्या नव्या घरात राहायला आलं.



आरंभी ते बहुधा जगातील
सर्वाधिक सुखी जोडपं होतं.



पण लग्नात मिळालेल्या
भेटवस्तू उघडल्यानंतर....



त्यांच्यात वाद सुरू झाला.



“दरवाजा बंद कर, गार वारा आत येतोय,” पती म्हणाला.

“मी तुझी नोकर नाही. तूच उठून बंद कर,” पत्नी उत्तरली.





“ऐक ना,” पती म्हणाला, “बघू, कोण सगळ्यात जास्त वेळ गप्प राहातंय. जो आधी तोंड उघडेल, तोच दरवाजा बंद करेल.” पत्नीने सहमती दर्शवली. गार वारा खोलीत वाहात राहीला.


रात्र सरू लागली....



दोघांपैकी कुणीच जागचं
हललं नाही.

दरवाजा उघडा पाहून काही चोर घरात शिरले.





त्यांनी घरातल्या चीज-वस्तू पाहिल्या.



त्यांनी पती-पत्नींनाही पाहिलं.



चोरांना ते निश्चल पुतळे असल्याचा भ्रम झाला.



त्यांनी साऱ्या वस्तू लुटून
नेल्या. अगदी पत्नीच्या
अंगावरचे दागिनेसुद्धा!


तरीही दोघे बोलले नाहीत,
जागचे हललेसुद्धा नाहीत.

काही वेळाने गस्त घालणारा पोलीस आला.
दरवाजा उघडा पाहून तो घरात शिरला.





“दरवाजा बंद करून घ्या,” तो म्हणाला.
पण पती-पत्नी जागचे हलले नाहीत.




“तुम्ही माझा आदेश पाळलाच पाहिजे,”
पोलीस गुरगुरला.




पती-पत्नीकडून काहीच प्रतिसाद मिळत नाही, हे पाहून पोलिस त्यांना ओढत-ओढत तुरुंगात घेऊन गेले.



पोलिसांचा आदेश पाळला नाही
म्हणून त्यांना दुसऱ्या दिवशी
सकाळी न्यायालयात नेले.



”तुम्ही काहीच बोलला नाहीत तर तो न्यायालयाचा अपमान ठरेल,” न्यायाधीशांनी पतीला इशारा दिला.



तो काहीच बोलत नाही हे पाहून ते गुरगुरले, “ठिक आहे, तुला चाबकाचे फटके देण्याचा आदेश देतो मी.”



“कृपा करून माझ्या पतीला मारू नका.”



“बघ,” पती ओरडला, “तू आधी
बोललीस आणि हरलीस.”





“आता तुलाच दरवाजा
बंद करावा लागेल.”


यानंतर ते
पती-पत्नी
आयुष्यभर
एकमेकांशी सुखाने
नांदले.



अंत